महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक: एडीसी-२५१८/सीआर-८/२०१८/तीन                                        दिनांक:- १७ नोव्हेंबर, २०१८

# घोषणा

## महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा-२०१८ पेपर क्रमांक २ कर सहायक

### प्रवेश प्रमाणपत्राबाबत

आयोगामार्फत रविवार, दिनांक २ डिसेंबर, २०१८ रोजी आयोजित महाराष्ट्र गट क सेवा मुख्य परीक्षा-२०१८ पेपर क्रमांक २ कर सहायक करीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळावर (https://mahampsc.mahaonline.gov.in) उमेदवारांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. प्रवेश प्रमाणपत्राची प्रत उमेदवारांनी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व प्रत्यक्ष परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**२.** प्रवेश प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यास अर्ज सादर केल्याच्या तसेच विहित कालावधीत परीक्षा शुल्क भरल्याबाबतच्या आवश्यक पुराव्यासह आयोगाच्या बॅंक ऑफ इंडिया इमारत, तिसरा मजला, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई ४००००१ येथील कार्यालयात संपर्क साधावा. यासंदर्भात उमेदवाराला ०२२ - ६१३१६४०२ या दूरध्वनी क्रमांकावरुन आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

**३.** परीक्षेच्या प्रवेशासंदर्भात परीक्षा झाल्यावर संपर्क साधल्यास परीक्षेसाठी उमेदवारीचा कोणत्याही प्रकारे विचार केला जाणार नाही.

**४.** परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**५.** प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वत:च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**६.** परीक्षेस येताना उमेदवाराने ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधारकार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड व स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी **किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत** सोबत आणणे अनिवार्य आहे. वरील विहित पाच ओळखीच्या पुराव्याव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारच्या ओळखीच्या पुराव्याच्या आधारे उमेदवारास परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**७. ओळखीच्या पुराव्यासाठी सादर करावयाच्या वर नमूद पाच ओळखपत्रांपैकी किमान एका ओळखपत्राची छायांकित प्रत प्रत्येक पेपर करीता स्वतंत्रपणे सादर करणे अनिवार्य राहील.**

**८.** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणा-या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह कलर प्रिंट मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**९.** फक्त प्रवेश प्रमाणपत्र, काळ्या शाईचे बॉल पॉइंट पेन, मूळ ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.

**१०.** स्मार्ट वॉच, डिजिटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्लू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्यायोग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, पॅड, पाऊच, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे.

**११.** आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्या वेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा शाळा/ महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही.

**१२.** परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उदभवू शकणा-या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, विहित वेळेच्या पुरेसे अगोदर संबंधित परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. **परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही.**

**१३.** ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील माहितीच्या आधारे उमेदवारांना परीक्षेस प्रवेश देण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा आयोगाच्या सूचनेनुसार कोणत्याही टप्प्यावर सादर करणे आवश्यक राहील. परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. अशा पडताळणीच्या वेळी उमेदवाराने अर्जाद्वारे केलेल्या दाव्याप्रमाणे आवश्यक पुरावा/कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवाराची कृती ही गैरप्रकार समजून संबंधित उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार कारवाई करण्यात येईल. तसेच, प्रचलित नियम/कायद्यातील तरतुदीनुसारही कारवाई करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई

उप सचिव (परीक्षा पूर्व)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग